**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०२/२००८**

## निशाणी २४ वरील आदेश

१. दोन्ही पक्षांनी केलेल्या परस्पर कथनावरून खालील मुद्दे माझेपुढे न्यायनिर्णयासाठी आलेले असुन कागदपत्राची पडताळणीनंतर त्यावर माझा अंतिम निर्णय खालीलप्रमाणे नोदविलेला आहे.

| मुद्दे | निष्कर्श |
|---|---|
| १. प्रस्तुत दावा दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होत आहे काय ? | ........नाही. |
| २. अतिम आदेश काय ? | .......खालीलप्रमाणे |

## कारणमिमांसा

२. दोन्ही पक्षांचे प्रतिपादन ऐकले. वादीतर्फे प्रतिपादन करण्यात आले की, मागीतलेली दुरूस्ती ही किरकोळ स्वरूपाची असुन तो तांत्रीक दोष टाईपींगमूळे झालेला आहे. ती चूक होणेसाठी दुरूस्तीस परवाणगी मिळणे गरजेचे आहे.

३. याउलट प्रतिवादीतर्फे प्रतिपादन करण्यात आले की, अर्जास संयुक्तीक कारण घडलेले नाही. केवळ चौकशी लांबणीवर टाकणेसाठी अर्ज दाखल केला आहे. दुरूस्तीमुळे वेगळी वस्तुस्थिती निर्माण होणार आहे. तसेच वादीच्याच वहीवाटीबाबात भिन्नता निर्माण होणार आहे. प्रस्तुतची दुरूस्ती ही किरकोळ स्वरूपाची नसुन दुरूस्तीमूळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदलत होत

आहे त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षांनी अर्जाच्या अनुशंगाने केलेली प्रतिपादन विचारात ठेवुन. प्रस्तुत दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होउन प्रतिवादीचे हक्कावर काही परिणाम होईल काय हयाची पडताळणी करणेसाठी वादी मागत असलेल्या दुरूस्तीचे अनुशंघानें दावा कलम तीन मधील पक्षकथन विचारात घेता दुरूस्तीमुळे नंबरात बदल झाल्यास दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होत नाही असे दिसून येतो. कारण मूळ दाव्याचा वादविषय हा जश्याचा तसा आबाधीत रहात आहे. दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ६ नियम १७ च्या तरतुदीचे आवलोकन करता संभाव्य दुरूस्तीमूळे दाव्यातील निर्माण झालेल्या तांत्रीक उणीवा दुर होवुन दोन्ही पक्षांचे वादाचे कायम निराकरण होणेस त्याची मदत होणार आहे. सबब अर्ज मुजंर होणेस पात्र आहे म्हणुन खालील आदेश

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो
२. वादीने अर्जाप्रमाणे दावा मुदतीत दुरूस्त करून त्याची प्रत सादर करावी.
३. प्रतिवादीस दुरूस्तीवर जादा कैफियत देण्याची मुभा आहे.
४. खर्चाबदद्ल आदेश नाहीत.

खंडाळा ( रतिलाल म. कराडे )
दिनांक २९/०६/२००९ दिवाणी न्यायाधिश क. स्तर खंडाळा